प्रेस नोट १४ दिनांक ३१/०८/२०२४

**शाळांमधील विद्यार्थी/विद्यार्थीनींच्या सुरक्षा उपाययोजनांबाबत परिमंडळ ६ अंतर्गत येणा-या शाळा कॉलेजच्या मुख्याध्यापक व प्राचार्य यांचेशी सुसंवाद साधलेबाबत...**

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे संकल्पनेतून शासन निर्णय क्रमांक : सुरक्षा-२०२४/प्र.क्र २४३/एस.डी.४, दि. २१/०८/२०२४ अन्वये शाळांमधील विद्यार्थी/विद्यार्थीनींच्या सुरक्षा उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करणेबाबत पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६, मुंबई या कार्यक्षेत्रात येणा-या शाळा/ महाविद्यालय यांचे मुख्याध्यापक/प्राचार्य/ ट्रस्टी यांचेशी दिनांक २९/०८/२०२४ रोजी १६:०० वा फाईन आर्ट सोसायटी, चेंबूर, मुंबई येथे सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन श्री हेमराजसिंह राजपूत, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६, मुंबई यांचे मार्फतीने करण्यात आले होते.

सदर कार्यक्रम मा. अपर पोलीस आयुक्त, डॉ.श्री. महेश पाटील यांचे अध्यक्षतेखाली पार पडला. तसेच श्री. किरतकुडवे, उपशिक्षणाधिकारी, पुर्व उपनगरे, मुंबई, श्रीमती निलम राणा, अधिक्षक, शिक्षण विभाग, पुर्व उपनगरे, मुंबई, श्री कैलास आर्य, प्रशासकिय अधिकारी, शिक्षण विभाग, पुर्व उपनगरे, मुंबई, परिमंडळ ६ अंतर्गत सर्व सहायक पोलीस आयुक्त, सर्व पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक (जनसंपर्क), निर्भया पथकाचे अधिकारी, संरक्षण व सुरक्षा विभागाच्या पोलीस निरीक्षक श्रीमती प्रभा राउळ व विविध शाळा महाविद्यालयांचे ७५० ते ८०० मुख्याध्यापक/प्राचार्य/ ट्रस्टी हजर होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री शशिकांत भंडारे, नेहरूनगर विभाग, मुंबई यांनी केली. सदर कार्यक्रमामध्ये शाळा महाविद्यालयामध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शाळांमधील विद्यार्थी/विद्यार्थीनींच्या सुरक्षा उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करणेबाबत प्रबोधनपर पीपीटी, व्हिडीओ यांद्वारे माहिती देण्यात आली. संरक्षण व सुरक्षा विभागाच्या पोलीस निरीक्षक श्रीमती प्रभा राउळ यांचेमार्फतीने ‘‘ जागृत मुंबईकर ’’ या कार्यक्रमामधून करावयाच्या उपाययोजनांची माहिती देण्यात आली.

श्री. प्रसाद सर, हेमू कलानी स्कूल, चेंबूर कॅम्प, चेंबूर, मुंबई, श्री सुनिल कदम, मारवली मनपा शाळा, श्रीमती माधवी अंमनेर, नॅशनल सर्वोदय हायस्कूल व ज्युनि. कॉलेज, चेंबूर, श्रीमती आरती भार्गव, प्रशासकिय अधिकारी, के जे सोमय्या कॉलेज, विद्याविहार, मुंबई, श्री. किरतकुडवे, उपशिक्षणाधिकारी, पुर्व उपनगरे, मुंबई, श्री हेमराजसिंह राजपूत, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६, मुंबई यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. श्री. महेश पाटील यांनी मोजक्या शब्दात शाळांमधील विद्यार्थी/विद्यार्थीनींच्या सुरक्षा उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करणेबाबत अवगत केले व त्यामध्ये

पोलीसांकडून पुर्ण मदत देण्याचे आश्वासन दिले. तसेच शाळा महाविद्यालयामध्ये होणा-या घटनांची माहिती न लपविता पोलीस ठाणेस तात्काळ माहिती देणेबाबत सुचना दिल्या. तसेच यापुर्वी विद्यार्थी/विद्यार्थीनींच्याबाबत घडलेल्या घटनांचे दाखले देवून अशा घटनांविषयी दक्ष राहून उपाययोजना करणेबाबत अवगत केले.

सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री राजेश बाबशेट्टी, ट्रॉम्बे विभाग, मुंबई यांनी उपस्थितांचे व कार्यक्रम पार पाडण्यामध्ये सहकार्य करणा-यांचे आभार मानून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

-------